# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी :- २२६१७९६९ फॅक्स : २२६९०००७

E-mail : mcm.dte@gmail.com Internet :http://www.dte.org.in

**Web Notification**

का.क्र.१८/तंशिसं/अल्प./२०१४/७८

दिनांक : २९/०४/२०१४

प्रति,

सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य,

विषय : राज्यशासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१३-१४

संदर्भ : या कार्यालयाची जाहिरात No.DTE/Minority/SGS/2013/257 Date: 13th Sept 2013

संदर्भाधीन जाहिरातीनुसार विद्यार्थ्यांकडून **www.dtemaharashtra.gov.in/scholarships** या सांकेतिक स्थळावर राज्यशासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१३-१४ साठी ऑनलाईन अर्ज मागवून संस्थेकडून ऑनलाईन तपासणी करुन मंजूर/नामंजूर करण्यात आले , त्याची तपशीलवार यादी संस्थेला (त्यांच्या लॉगिन आयडी व त्यांना देण्यात आलेल्या पासवर्ड व्दारे लॉगिन करुन) **Institute Panel** च्या अंतर्गत येणारा **Registered Candidate List** मध्ये देण्यात आलेली आहे.

त्यामध्ये संस्थेव्दारे मंजूर यादीमध्ये येणा-या विद्यार्थ्यांसाठी **Reject** चा **Option** देण्यात आलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांना संस्थेने चुकीने किंवा जे विद्यार्थी दुस-या शासनाच्या योजनेचा (जसे इबीसी / सामाजिक विभाग कडून इ.) लाभ घेत आहेत किंवा घेणार अशा त्या विद्यार्थ्यांना संस्थेने **नामंजूर चे कारण निवडून Reject** करावे, यासाठी संस्थेने या पत्राच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

या कार्यालयाकडून एकदा शासननिर्णयाप्रमाणे अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती [ केंद्रशासनाची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (**Merit-cum-Means**) / राज्यशासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती ] मंजूर झाल्यानंतर व शिष्यवृत्ती योजनेची रक्कम सरळ विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याकारणाने कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती रद्द करता येणार नाही.

जर विद्यार्थ्यांना दुसरी शासकीय शिष्यवृत्ती / सवलत मंजूर करण्यात आली असेल / करण्यात येईल तर संस्थेने त्यामधून त्या विद्यार्थ्यांचे नाव वगळण्यात यावे, याची संबंधित संस्थेने नोंद घ्यावी.

**शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थी एकाच शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकतो, जर एकच विद्यार्थी दोन-दोन शासकीय शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेत असेल तर त्या संबंधित संस्थेला जबाबदार धरण्यात येईल.**

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा.,मुंबई.

प्रत: विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद यांना माहितीसाठी.

---

**अतिमहत्वाचे**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/अल्पसंख्यांक शिष्य./२०१४/ 1378
दि. 3 MAY 2014

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था, नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद असल्याप्रमाणे अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर